# मुंबई विद्यापीठ

क्र.वि.क./आयसीसी/२०२२–२३/०२
दिनांक – २० ऑगस्ट,२०२२

परिपत्रक :–

**विषय** – स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्ताने **'स्वातंत्र लढयात अनुसूचित जमातीतील नायकांचे योगदान'** या विषयी कार्यक्रमाबाबत.

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त पदव्युत्तर संस्था, स्वायत्त महाविद्यालये व संस्था, अल्पसंख्याक महाविद्यालये तसेच विद्यापीठातील संस्था व विभाग यांचे प्राचार्य/संचालक/विभाग प्रमुख यांना सूचित करण्यात येते की, राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोग व मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने **शुक्रवार, दिनांक २६ ऑगस्ट, २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता** देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्ताने **'स्वातंत्र लढयात अनुसूचित जमातीतील नायकांचे योगदान'** या विषयी सर कावसजी जहांगीर सभागृह, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०००३२, येथे एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर कार्यक्रम **राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोगाचे सन्माननीय अध्यक्ष श्रीयुत हर्ष चौहान** यांच्या प्रमुख उपस्थितीत व **मुंबई विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. सुहास पेडणेकर** यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे.

सदर कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण आभासी (Online) पध्दतीने सुध्दा मुंबई विद्यापीठाच्या संकेत स्थळावरून (www.mu.ac.in) प्रक्षेपित करण्यात येईल.

तरी आपण आपल्या महाविद्यालयातील विशेषत: अनुसूचित जमाती मधील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांना प्रतिनिधिक स्वरूपात प्राधान्याने कार्यक्रमासाठी प्रत्यक्ष (Off-line) पाठविण्याची व्यवस्था करावी.

(डॉ. विनोद पाटील)
प्रभारी कुलसचिव

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :–
विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त पदव्युत्तर संस्था, स्वायत्त महाविद्यालये व संस्था, अल्पसंख्याक महाविद्यालये तसेच विद्यापीठातील संस्था व विभाग यांचे प्राचार्य/संचालक/विभाग प्रमुख यांना अग्रेषित.

प्रति,

१) मा. वित्त व लेखा अधिकारी, वित्त व लेखा विभाग, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई.
२) उपकुलसचिव, सामान्य प्रशासन विभाग, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०००३२.
३) विद्यापीठ अभियंता, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.
४) सुरक्षा अधिकारी, सुरक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.
५) स्वीय सहायक, कुलगुरू, प्र–कुलगुरू, कुलसचिव कार्यालय, मुबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०००३२.
६) अभिलेखा विभाग, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.

(डॉ. विनोद पाटील)
प्रभारी कुलसचिव